MHNG130026692023

कौ. हि. अर्ज क्रमांक २८/२०२३
शिवाणी वि. चंद्रशेखर

**अंतरिम पोटगी मिळण्याच्या अर्जावरील आदेश**
**(पारीत दिनांक ११/०३/२०२४)**

अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

२} ***अर्जदाराचे थोडक्यात कथन पुढीलप्रमाणे*** :-

अर्जदाराने गैरअर्जदाराविरुद्ध कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. अंतरीम अर्जावर निर्णय देताना अर्जदाराने केलेल्या मुख्य अर्जातील मजकुर व माहिती लक्षात घेण्यात यावा. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदारास सतत शिवीगाळ करुन तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन हाताबुक्क्याने मारहाण करुन शारीरीक व मानसीक त्रास देत होता. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ विरुद्ध दिनांक १६/१०/२०२२ व दिनांक १५/११/२०२२ रोजी अर्जदाराने पोलीस स्टेशन कोराडी येथे रिपोर्ट दिलेला आहे. दिनांक ०९/०३/२०२३ रोजी सकाळी गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी अर्जदार क्र. १ हिच्यासोबत शुल्लक कारणावरुन वाद केला व लाथाबुक्क्याने मारहाण केली. गैरअर्जदार क्र. २ व ३ यांच्या सांगण्यावरुन गैरअर्जदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ हिला बेदम मारहाण केली. त्यामुळे अर्जदार क्र. १ च्या शरीराला दुखापत झाली. त्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ व तिच्या मुलीला घराबाहेर काढले व परत आल्यास जिवाने मारुन टाकु, अशी धमकी दिली. अर्जदार क्र. १ ही जिवाच्या भितीने तिच्या मुलीला घेऊन पटगोवारी येथे तिच्या आई-वडीलांकडे आश्रयास आली. तेव्हापासून ती तिच्या आई-वडीलांच्या आश्रयास राहत आहे. अर्जदार हिच्या उदरनिर्वाहाकरीता, औषधोपचाराकरीता तसेच कपडेलत्त्याकरीता तिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदाराला कोणतीही आर्थिक मदत करीत नाही. अर्जदाराने केलेल्या मुख्य अर्जाचा निर्णय लागण्यास खूप वेळ लागेल व अर्जदाराला

उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्यामुळे अंतरीम खावटी मिळणे गरजेचे व आवश्यक आहे. गैरअर्जदार क्र. १ हा कोराडी पावर प्लांट येथे ड्रायव्हरचे काम करतो व त्याला दरमहा ३५ ते ४० हजार रुपये मासिक उत्पन्न मिळते. त्या कारणाने गैरअर्जदार क. १ हा अर्जदाराला प्रत्येकी दरमहा रु.१०,०००/– एवढी अंतरीम खावटी देण्यास सक्षम आहे. त्यामुळे अर्जदाराला मुख्य अर्जाचा निर्णय होईपर्यंत दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– खावटी अर्जदाराला मंजुर करण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे.

३} गैरअर्जदार क्र. १ व २ यांना अर्जाच्या नोटीसची योग्यरित्या बजावणी झाल्यानंतर त्यांनी हजर होऊन निशाणी क्र. १२ वर गैरअर्जदार क्र. १ ने त्याचे म्हणणे दाखल केलेले आहे. गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी हजर होऊन देखील अर्जदाराच्या अर्जाला म्हणणे दाखल केलेले नाही. गैरअर्जदार क्र. १ व २ यांनी अर्जदाराच्या अर्जातील संपूर्ण कथने नाकारली आहेत. गैरअर्जदाराचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्जदार लग्न झाल्यानंतर गैरअर्जदार यांच्या घरी कोराडी येथे राहण्यास आली. त्यावेळी गैरअर्जदार क्र. १ व त्याचे आई–वडील हे एकत्र राहत होते. गैरअर्जदार क्र. ३ ही त्यांच्या लग्नाच्या अगोदरपासूनच तिच्या मुलीसोबत वेगळी राहत होती व आताही वेगळी राहत आहे. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ सोबत काही दिवस चांगली वागली. त्यानंतर अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार याच्या आई–वडीलांसोबत एकत्र राहायचे नसल्याने नेहमी वेगळे राहू, असे म्हणत होती. गैरअर्जदार क्र. १ याच्या आई–वडीलांना त्याच्याव्यतिरीक्त कोणीही नाही. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार यांच्यासोबत नेहमी शुल्लक कारणावरुन भांडण करुन अश्लील भाषेत शिवीगाळ करीत होती. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ याच्यावर नेहमी संशय घेत होती. अर्जदाराच्या हट्टापोटी व घरामध्ये भांडण/वाद उत्पन्न होऊ नये, म्हणून गैरअर्जदार क्र. १ याने नोव्हेंबर–२०२० मध्ये मौजा पांजरा या गांवी किरायाची खोली केली व अर्जदाराला तेथे घेऊन राहू लागला. त्यावेळी देखील अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ याच्यासोबत शुल्लक कारणावरुन वाद करीत होती. अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ याच्या आईला देखील अपमान करुन घरातुन हाकलुन दिले. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे पांजरा या गांवी राहत असताना अर्जदार क्र. १ ही तिच्या मित्रांना घरी बोलावुन वेळ घालवत होती. त्याबाबत तिच्याकडे विचारणा केली असता अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ याच्यासोबत भांडण केले व स्वतःची बदनामी होईल म्हणुन विष देखील घेतले.

४} त्यानंतर अर्जदार व गैरअर्जदार हे पुन्हा कोराडी येथे राहायला आले. अर्जदार क्र. १ हिचे लग्न तिच्या इच्छेविरुद्ध झाल्याने गैरअर्जदार क्र. १ याला सोडचिठ्ठी मागुन खोट्या केसमध्ये फसविण्याची धमकी देत होती. दिनांक ०९/०३/२०२३ रोजी शुल्लक कारणावरुन अर्जदार क्र. १ हिने गैरअर्जदार क्र. १ सोबत भांडण करुन तिच्या घरच्यांना बोलावुन घेतले व त्यांच्यासोबत निघुन गेली. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार ही स्वतःहुन तिच्या माहेरी राहत असल्याने तिला पोटगी मागण्याचा अधिकार नाही. अर्जदार क्र. १ ही किमया हॉस्पीटल रामटेक येथे जॉबवर असुन तिला दरमहा १० हजार रुपये पगार मिळतो. अर्जदार क्र. १ ही स्वतःचा उदरनिर्वाह चांगल्या रितीने करु शकते. गैरअर्जदार क्र. १ हा कोराडी पावर प्लांट येथे नोकरीवर असुन त्याला दरमहा रु.२३,८००/– पगार मिळतो. गैरअर्जदार क्र. १ याने दुचाकी वाहनासाठी कर्ज घेतलेले आहे. त्यामुळे प्रति महिना रु.३,७००/– किस्त पगारातुन कपात होते. गैरअर्जदार क्र. १ याच्यावर त्याच्या आई–वडीलांची जबाबदारी आहे. गैरअर्जदाराला लकवा झालेला असल्यामुळे आजही ते आजारातुन बरे झालेले नाहीत. त्यामुळे अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

५} अर्जातील व गैरअर्जदार यांच्या म्हणण्यातील कथने, अर्जदाराने व गैरअर्जदाराने दाखल केलेली कागदपत्रे तसेच अर्जदारातर्फे श्री. एम.व्ही. येरपुडे व गैरअर्जदारातर्फे श्री. ए.जी. कारेमोरे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले असून मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार याने तिच्यावर कौटुंबिक स्वरुपाचा हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते का ? | ..होकारार्थी. |
| २) | अर्जदार ही गैरअर्जदार याच्याकडून दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– अंतरिम पोटगी स्वतःसाठी व तिच्या मुलीसाठी मिळण्यासाठी पात्र आहे का ? | ..होय, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ३) | कोणता आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र. १ करीता** :-

६} अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार कायदा, २००५ अन्वये लग्नानंतर अर्जदार व गैरअर्जदार हे कौटुंबिक नातेसंबंधातून एकत्र राहत असतांना गैरअर्जदाराने अर्जदाराचा शारीरिक व मानसीक छळ केल्यामुळे दाखल केलेला आहे. अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचा विचार करता गैरअर्जदाराने तिच्यावर कौटुंबिक स्वरुपाचा हिंसाचार केल्याने अर्जदार ही तिच्या माहेरी दिनांक ०९/०३/२०२३ रोजीपासून राहत आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न दिनांक १४/०६/२०२० रोजी हिंदू रितीरिवाजाप्रमाणे झाले होते, हे उभयपक्षांना मान्य आहे. अर्जदाराच्या अर्जातील कथनांचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ याने लग्नामध्ये सोन्याचा गोफ दिला नाही म्हणुन व दारु पिऊन नेहमी अर्जदार क्र. १ हिला शिवीगाळ व मारहाण करुन शारीरीक व मानसीक त्रास दिल्याचे अर्जात कथन केलेले आहे. याऊलट, गैरअर्जदाराने अर्जदाराची संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. गैरअर्जदार क्र. १ याला अर्जदार क्र. १ ही त्याची पत्नी असल्याचे मान्य आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार करता अर्जदाराने गैरअर्जदाराविरुद्ध दिनांक १५/१०/२०२२ व १६/११/२०२२ रोजी कोराडी पोलीस स्टेशनला अदखलपात्र गुन्हे नोंदवल्याचे दिसून येते. सदरचे गुन्हे हे गैरअर्जदार क्र. १ याच्याविरुद्ध भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४, ५०६ अंतर्गत दारु पिऊन अर्जदाराला शिवीगाळ करुन मारहाण केल्यामुळे दाखल झालेले आहेत. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यामध्ये कौटुंबिक हिंसाचार झाल्यामुळे अर्जदाराने कौटुंबिक मार्गदर्शन केंद्राकडे देखील अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. अर्जदाराने विष पिल्याबाबत देखील गैरअर्जदाराने त्याच्या कथनांमध्ये नमुद केलेले आहे. अर्जदार क्र. १ हिच्यावर गैरअर्जदार यांनी कौटुंबिक स्वरुपाचा अत्याचार केल्याशिवाय अर्जदार क्र. १ ही विष पिणार नाही. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराने तिच्यावर कौटुंबिक स्वरुपाचा अत्याचार केल्याशिवाय त्यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन व भरोसा सेल कौटुंबिक सल्ला व मार्गदर्शन केंद्र यांच्याकडे तक्रारी दाखल करणार नाहीत. त्यामुळे एकंदरीत अर्जदार व गैरअर्जदार यांची कथने व माझ्यापुढे दाखल असलेल्या कागदपत्रांचा विचार करता मी या मतास आलेलो आहे की, गैरअर्जदार यांनी अर्जदार क्र. १ वर कौटुंबिक स्वरुपाचा

हिंसाचार केलेला आहे.

७} *कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २–अ नुसार 'जी स्त्री जाब देणार याच्याबरोबर कौटुंबिक संबंधाने राहत होती किंवा आहे आणि ती कौटुंबीक हिंसाचाराला बळी पडली आहे अशी स्त्री पीडीत व्यक्ती म्हणून गणली जाते.*' प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदाराने कथन केलेल्या बाबींचा विचार करता गैरअर्जदार क्र. १ ते ३ यांनी अर्जदारावर लहान–सहान कारणावरुन शिवीगाळ करुन तसेच गैरअर्जदार क्र. १ याने तिला मारहाण करुन तिच्यावर कौटुंबिक स्वरुपाचा हिंसाचार केल्याचे दिसून येते. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** :–

८} गैरअर्जदार यांनी अर्जदारावर कौटुंबिक स्वरुपाचा हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध झाल्यानंतर अर्जदार ही तिची मुलगी कुमारी अंशिका हिला घेऊन तिच्या माहेरी दिनांक ०९/०३/२०२३ पासून आई–वडीलांकडे राहत आहे. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार हा कोराडी पावर प्लांट येथे गाडीवर ड्रायव्हर असुन त्याला दरमहा ३५ ते ४० हजार रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे अर्जदार यांना गैरअर्जदार हा पोटगी देण्यास सक्षम आहे. गैरअर्जदार याने त्याचे म्हणणे दाखल करुन कोराडी पावर प्लांटमध्ये डोअर ऑपरेटर म्हणुन तो नोकरीस असल्याचे मान्य केलेले आहे. गैरअर्जदार क्र. १ याने त्याला रक्कम रु.२३,८००/– पगार मिळतो, ही बाब देखील मान्य केलेली आहे. परंतु, त्याच्या म्हणण्यानुसार त्याला कटौती होऊन केवळ रक्कम रु.२१,८४३/– पगार मिळतो व त्याने दुचाकी वाहनासाठी एक लाख कर्ज घेतल्याने दरमहा रक्कम रु.३,७००/– किस्त पगारामधुन कपात होते. त्याच्यावर त्याच्या आई–वडीलांना सांभाळण्याची देखील जबाबदारी आहे. अर्जदार क्र. १ ही स्वतः कोणत्याही संयुक्तीक कारणास्तव माहेरी राहत असल्याने व ती किमया हॉस्पीटल, रामटेक येथे जॉबवर आहे, तिला दरमहा दहा हजार रुपये पगार मिळत असल्याने पोटगीची आवश्यकता नाही. गैरअर्जदाराने निशाणी क्र. १५ सोबत अर्जदार क्र. १ हिचा फोटो दाखल केलेला आहे. परंतु, सदरची बाब न्यायालयाच्या पुढे चौकशीअंती सिद्ध होणे आवश्यक आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांनी असेट्स ॲन्ड लायबिलीटीज ॲफीडेव्हीट दाखल केलेले आहे. त्यातील बाबी मी विचाराधीन घेतलेल्या आहेत. गैरअर्जदार क्र. १ याच्यावर त्याच्या आई–वडीलांचा

सांभाळण्याची जबाबदारी असली तरी गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ व त्याची मुलगी अंशिका यांना सांभाळण्याची जबाबदारी टाळु शकत नाही. गैरअर्जदाराने कोराडी पावर प्लांट येथील मार्च–२०२३ या महिन्याची पगाराची स्लीप दाखल केलेली आहे. त्यामध्ये गैरअर्जदाराला रु.२३,८००/– पगार मिळत असुन त्याच्या पगारातुन रु.१,९५७/– ची कपात होते व एकुण रु.२१,८४३/– एवढी रक्कम हातात येते. अर्जदार क्र. १ व २ यांच्या पोटापाण्याची, औषधपाण्याची, अन्नधान्याची व इतर खर्चाची सोय करणे ही हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ याच्यावर जबाबदारी आहे. अर्जदार क्र. २ ही दोन वर्षाची आहे. अर्जदार क्र. २ ही अर्जदार क्र. १ हिच्यासोबत तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार क्र. २ हिच्या औषधपाण्याचा व कपड्यालत्त्याचा खर्च देखील विचारात घेणे महत्वाचे आहे. अर्जदार व गैरअर्जदार यांची परस्परविरोधी कथने व माझ्यासमोर उपस्थित झालेली त्यांची आर्थिक परिस्थिती यांचा विचार करता अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदार क्र. १ याने दरमहा ३ हजार रुपये पोटगी अर्ज दाखल तारखेपासून देणे योग्य राहील. अर्जदार क्र. २ हिला गैरअर्जदार क्र. १ याने दरमहा २ हजार रुपये पोटगी अर्ज दाखल तारखेपासून देणे योग्य राहील. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चे उत्तर वरीलप्रमाणे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता</u>** :–

९} अर्जदार क्र. १ ही दिनांक ०९/०३/२०२३ पासून तिची मुलगी अंशिका हिला घेऊन तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदाराच्या औषधपाण्यासाठी, कपडेलत्त्यासाठी, अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंसाठी कोणतीही सोय केलेली नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

(१) अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु.३,०००/– व तिच्या मुलीसाठी दरमहा रक्कम रु.२,०००/– अशी एकूण दरमहा रक्कम रु.५,०००/– (अक्षरात पाच हजार रुपये) अर्ज दाखल तारखेपासुन अंतरिम पोटगी द्यावी, असे आदेश देण्यात येतात.

(३) या अर्जाची एक प्रत अर्जदाराला विनाशुल्क देण्यात यावी.

Sd/-

रामटेक. **(एच. एस. सातपुते)**

दिनांक : ११/०३/२०२४. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रामटेक.